MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

April To June 2017
Issue-18, Vol-10

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

### ❖ Editorial Board ❖

1) Dr. Vikas Sudam Padalkar **(Japan)**
2) M.Saleem, Sialkot **(Pakistan)**
3) Dr. Momin Mujtaba **(Saudi Arebia)**
4) Dr. Anupama Alvikar **(Turkey)**
5) N.Nagendrakumar **(Sri Lanka)**
6) Dr. Wankhede Umakant **(Maharashtra)**
7) Dr. Dixit Kalyani **(Lucknow)**
8) Dr. Basantani Vinita **(Pune)**
9) Dr. Upadhya Bharat **(Sangali)**
10) Dr. J. David Livingston **(Thirupathy)**
11) Dr. Kachare S. V. **(Parli-V)**
12) Dr. Jubraj Khamari **(ORISSA)**
13) Krupa Sophia Livingston **(Tamilnadu)**
14) Dr. Umesh chandr Shukl **(Mumbai)**
15) Dr. Ambhore Shankar **(Jalna)**
16) Dr. B.J.Patel **(Gujrat)**
17) Manmeet Kaur ((**Uttrakhand)** )
18) Dr. Sunil S. Trivedi **(Gujrat)**
19) Dr. Ravindra Kewat **(Chandrapur)**
20) Preeti Sarda **(Hyderabad)**
21) Prof.Surwade Yogesh **(Satara)**

### ❖ Advisory Committee ❖

1) Dr. Chodhari N.D. **(Kada)**
2) Dr. Yallawad Rajkumar **(Parli v.)**
3) Dr. Yerande V. L. **(Nilanga)**
4) Dr. Shinde Sunil **(Parbhani)**
5) Dr. Awasthi Sudarshan **(Parli v.)**
6) Ghante Pradipkumar , **Solapur (MS)**
7) A. Durga Prasad, **Telangana**
8) Dheeraj Kumar Pandey, **Varanasi (U.P.)**
9) Prof. Machale Ravinda **(Parli v.)**
10) Vipin Panday, **Kanpur (U.P.)**
11) Dr.V.Aruna, **Chennai (Tamilnadu)**
12) Dr. Avineni Kishor, **Kuppam(Kerala)**
13) Prof. Deshmukh Suryakant **(Parli v.)**
14) 23) Dr. Dhaigude R. B. **(Parli v.)**
15) Dr. Rajendra Acharya **(Parli v.)**
16) Dr. Manoj Kr Sharma **(Haryana)**
17) Dr. Rajesh Chandra Paliwal (**Uttrakhand)**
18) Dr. Suresh Babu **(Hyderabad)**
19) Deepak Nema **(M.P.)**
20) Dr. Piyush Pandey **(New Delhi)**
21) Dr. Vidya Gulbhile **(M.S.)**



UGC Approved Sr.No.8431, 7912, 4673, 7775, 7790

Impact Factor 4.014 iijif

Govt. of India, Trade Marks Registry Regd. No. 2611690


**Note :** The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Vidyawarta' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university,institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Vidyawarta is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)



Scanned with CamScanner

20

# साहित्यकृतीच्या दृक्-श्राव्य माध्यमांतराचे स्वरुप

डॉ. प्रमोद गंगाधर आंबेकर
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
मनमाड ता. नांदगाव जि. नाशिक

***********

**सारांश:-**

एकोणीसाव्या शतकात प्रसारमाध्यमांची सुरुवात झाली. तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबरच प्रसारमाध्यमांमध्ये प्रगती होऊन मुद्रीत माध्यम ते इलेक्ट्रॉनिक्स माध्यम असा त्यांचा विकास झाला. हा विकास होताना लेखनाच्या पद्धतींमध्ये त्या त्या माध्यमानुसार भरत पडत गेली. तरीही प्रत्येक माध्यमाने आपले वेगळेपण जपण्याचा प्रयत्न केला. आपापल्या परीने वाचकांना, श्रोत्यांना, प्रेक्षकांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे जनजीवनावर त्यांचा परिणाम होऊन जनजीवन गतिमान होत गेले. व्हाटसॲप, फेसबुक, २४ तास चालणाऱ्या बातम्या देणाऱ्या वाहिन्यांमुळे व त्यांना मिळालेल्या संगणक तंत्रज्ञानामुळे एखादी घटना काही वेळातच जगभर पोहोचते. या माध्यमांच्या जोडीलाच चित्रपट या माध्यमानेही मोठी झेप घेतली आहे. वेगवेगळ्या साहित्यकृतींवर आधारलेल्या चित्रपटांनी हल्ली समाजजीवनात चांगले नाव कमविले आहे. फॅन्ड्री, कुंकू, निशाणी डावा अंगठा, जोगवा, नटरंग, सिंहासन, दुनियादारी यांसारख्या चित्रपटांना चांगली प्रसिद्धी मिळाली आहे.त्याचबरोबर दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांवरील मालिका लोकप्रिय होतांना दिसतात. त्यामुळे साहित्य कलेचे स्वरुप आणि दृक्-श्राव्य माध्यमांचे स्वरुप ज्ञात करुन घेतल्यास साहित्यकृती ते दृक्-श्राव्य माध्यमांतर करण्यासाठी आवश्यक असलेली लेखन कौशल्ये विकसित करण्यास मदत होईल.

**प्रास्ताविक:-**

साहित्यातून मानवी जीवनाचा वेध घेतला जातो. माणसाच्या विविध प्रवृत्ती, स्वभाव साहित्यातून व्यक्त होतात. साहित्य हे मानवी जीवनमूल्यांची जोपासना करण्याचे, संस्कृती संवर्धनाचे कार्य करते. साहित्य कलेचे माध्यम शब्द हे आहे. कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललितनिबंध इत्यादी प्रकारांतून साहित्य अभिव्यक्त होत असते. त्यांतून समाजजीवनाचे चित्रण होत असते तर चित्रपटांतून सुद्धा मानवी जीवनाचा वेध घेतला जातो. माणसाच्या विविध कृती-प्रवृत्ती, स्वभाव चित्रपटातून व्यक्त होतात. मानवी जीवनमूल्याची जोपासना करण्याचे कार्यही चित्रपटांतून केले जाते. मात्र त्याचे माध्यम दृक् श्राव्य असून अभिनय व संवाद यांच्या माध्यमातून तो प्रकट होत असतो. साहित्याचे प्रयोजन यश, अर्थ, व्यवहारज्ञान, शिवेतर क्षयते, आनंदप्राप्ती, कांतासम्मीत उपदेश, आत्माविष्कार, पलायनवाद, स्वप्नपूर्ती, उद्‌बोधन, आत्मबल यांसारखे असते तर चित्रपटालाही ही प्रयोजने काही प्रमाणात लागू पडतात. मात्र या माध्यमातून प्रामुख्याने प्रेक्षकांचे मनोरंजन करताना भांडवलशाही दृष्टिकोन अवलंबिला जातो. निर्मात्याने गुंतवणूक केलेली असल्यामुळे जास्तीत जास्त नफा कसा मिळेल या दृष्टिकोनातून लोकप्रिय कलावंतांची निवड केली जाते. त्यासाठी लोकप्रिय साहित्यकृतींची निवड केली जाते. या कथासूत्रांवरच पटकथा लिहून जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत जाण्याचे लक्ष्य ठेवले जाते. लेखकाची निर्मिती वैयक्तिक असते तर चित्रपटाची निर्मिती सामूहिक प्रक्रिया असते. कथा, पटकथा, संवाद, संगीतकार, गीतकार, कॅमेरामन, नेपथ्यकार, दिग्दर्शक, निर्माता, संकलक इत्यादींच्या सामूहिक कौशल्यातून चित्रपटाची निर्मिती होत असते. या सर्वांची सामूहिक जबाबदारी असते. त्यात दिग्दर्शकाची भूमिका अतिशय महत्वाची असते. तो एक लेखक, चांगला अभिनेता, संगीताचे ज्ञान असणारा, कॅमेऱ्याची व शूटींगची जाण असणारा तसेच उत्कृष्ट संकलक असावा लागतो. चित्रपटाच्या प्रारंभिक अवस्थेपासून ते प्रदर्शनापर्यंतच्या सर्व गोष्टींचे ज्ञान त्याला असणे आवश्यक असते. त्यामुळे चित्रपट निर्माण करायचा म्हटला की अगोदर दिग्दर्शकाची निवड केली जाते.

**साहित्य कलेचे शब्दरुप :-**

साहित्य या संकल्पनेसाठी प्रारंभीच्या काळात काव्य



Scanned with CamScanner

हा शब्द वापरला जाई. साहित्य किंवा काव्य याचा अर्थ ललित साहित्य किंवा ललित वाङ्मय हा होय. प्राचीन काळी छापण्याची सोय नव्हती. त्यामुळे मुखद्गत (पाठांतर) केलेले जे वाणीतून (बोलण्यातून) बाहेर पडेल त्याला 'वाङ्मय' असे म्हटले जात. हे वाङ्मय विदग्ध म्हणजे उच्च दर्जाचे असेल, त्यात उत्कटता व रसात्मता असेल तर त्यास 'सारस्वत' असे म्हटले जाई. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत 'सारस्वत' हा शब्द वापरला आहे. वर्तमानकाळात वाङ्मय मुद्रित स्वरुपात उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे वाङ्मय हा शब्द मागे पडून साहित्य हा शब्द रुढ झाला आहे. साहित्य हा शब्द सहित्व (बरोबर) या शब्दापासून आलेला आहे. सहित्व म्हणजे बरोबर असणे. साहित्यात शब्द आणि अर्थ यांचे सहित्व असते. साहित्य ही एक शिल्प, नृत्य, संगीत, चित्र इ. ललित कलांप्रमाणे एक ललित कला (आनंद देणारी) आहे. शब्दाच्या माध्यमातून व्यक्त होणारी ती शब्द कला आहे. साहित्याचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे ते चिरंजीव, शाश्वत स्वरुपाचे असते. लेखकाच्या सर्जनशील कल्पनाशक्तीला ज्यात भरपूर वाव मिळाला असेल, ज्यात कल्पनाविलास, सौंदर्यतत्त्व व भावनाविष्कारात विविध कला सौंदर्य सामावले असेल अशाच वाङ्मय लेखनाला साहित्यलेखन म्हटले जाते. साहित्य ही अशी एक शब्दाकृती असते की जिच्यात भावना, कल्पना आणि विचार यांचा भाषेच्या माध्यमातून आविष्कार घडविलेला असतो. साहित्य ही एक अमूर्त संकल्पना असून विशिष्ट घाटात व्यक्त झालेली साहित्यकृती हे त्याचे मूर्त रुप असते. साहित्यकृतीतील संवेदना, भावना, विचार, शब्द, अर्थ प्रतिमादींमुळे ती साहित्यकृती एक रुप घेते, ते एकच असते आणि त्याचा वाचकांवर होणारा परिणाम एकसंधच असतो. साहित्यकृतीच्या अनेक घटकांतून एकच परिणाम साधला जातो. म्हणजे अनेकांतून एकत्वाचा अनुभव वाचकाला मिळत असतो. त्यामुळेच साहित्यकृती ही सेंद्रिय चैतन्यशील असते.

**दृक-श्राव्य माध्यमाचे स्वरुप :-**

एकाचवेळी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने डोळे आणि कान या ज्ञानेंद्रियांना संवेदन देऊन अर्थपूर्ण दृश्य आणि ध्वनींच्या माध्यमातून संप्रेषण साधणारे माध्यम म्हणजे दृक-श्राव्य माध्यम. चित्रपट, प्रोजेक्टर, दूरदर्शन, संगणक, मोबाईल इत्यादी यंत्रांद्वारे या माध्यमाचे कार्य चालते. दृशक (कॅमेरा) या माध्यमाच्या विकासातून आधुनिकीकरणाबरोबर चित्रपटकलेची शैली निर्माण झाली. 'मॅजिक लॅंटर्न' वा जादूचा दिवा या आदिरुपाबरोबर छायाचित्रण (स्थिर) या कलेचा विकास होत जाऊन चलच्चित्र निर्माण झाले. ध्वनीच्या शोधाबरोबर या माध्यमाने आपल्या भाषेत ध्वनींना समाविष्ट केले. मूकपट बोलपट म्हणून संवाद साधू लागले. छायाचित्रणातून निर्माण झालेली दृक-प्रतिमा आणि ध्वनी-प्रतिमा एकमेकांस पूरक राहिल्या. यंत्र माध्यमाच्या विकासातून निर्माण झालेली चित्रपट ही कला इतर कलांना आपल्यात सामावून त्या कलांपेक्षा अधिक परिणामकारक व लोकाभिमुख होत गेली आणि उच्च कलेच्या दर्जाला पोहचली.

दृक-श्राव्य कलेत दृश्यांना अधिक महत्त्व असते. कॅमेऱ्याच्या सहाय्याने निर्माण होणारी दृश्य-प्रतिमा आणि असंख्य दृश्य-प्रतिमांच्या सहयोगातून निर्माण होणारी अर्थपूर्ण दृश्यांची संहिता चित्रपटाच्या आकृतिबंधाचा आविष्कार घडवत असते. ही दृश्य प्रतिमा चित्रफितीवर मुद्रित होण्याअगोदर या संहितेचे असलेले शब्द-प्रतिमेतील रुप, दृश्य-प्रतिमेचा अनुभव देत असते. या शब्द-प्रतिमेच्या लिखित स्वरुपाला 'पटकथा' असे म्हणतात. ही पटकथा चित्रपटाच्या माध्यमातून 'दृश्य'रुप धारण करताना पात्रांचा अभिनय, संगीत, दृश्याची पार्श्वभूमी (स्थळ) या घटकांचा म्हणजेच साहित्य, नाट्य, संगीत, शिल्प इत्यादी कलांचा संयोग होत असतो. त्यातून चित्रपटाची स्वतंत्र भाषा निर्माण होत असते. या भाषेचे स्वातंत्र्य प्रतिपादताना प्रसिद्ध दिग्दर्शक सत्यजित राय लिहितात, 'नाटकातील द्वंद, कादंबरीतील कथा व पार्श्वभूमीचे वर्णन, संगीतातील गती आणि छंद, पेंटींगमधील छाया प्रकाशाची योजना या सर्वांना चित्रपटामध्ये स्थान असते. पण दृश्य आणि ध्वनी यांची जी भाषा, दाखवण्या-ऐकण्यापलीकडे जिची मजल जात नाही, ती एकदम स्वतंत्र भाषा आहे, म्हणूनच कथ्य एकच असले तरी प्रकटीकरणाच्या पद्धतीत, शैलीत फरक असणारच. ही शैली चित्रपटाची विशेष शैली असते. म्हणूनच इतर कला व साहित्याची लक्षणे असूनही चित्रपट कला ही एक संपूर्ण वेगळी कला आहे... दृश्य व ध्वनी म्हणजे केवळ दृश्येच नव्हेत, तर संवाद असलेली दृश्ये. पेंटिंगमध्ये सुरुवात व शेवट असतो, पण चित्रपटात मात्र त्यातील दृश्य भाग



Scanned with CamScanner

हीच काही चित्रपटाची सुरुवात नाही किंवा परिसिमाही नाही. चित्रपटात प्रमुख असतो दृश्याचा अर्थ. एक-एक दृश्य एकेका वाक्याप्रमाणे असते व सर्व चित्रपट मिळून पूर्ण वक्तव्य बनते.' (विश्व चलत्चित्र, अनु. विलास गीते पृ. ९, १०) अशा प्रकारे अनेक अर्थपूर्ण, सूचक दृश्यांच्या मालिकेतून कथानक दृग् गोचर होत असते.

चित्रपटावर दिग्दर्शकाची विशिष्ट शैली व दृष्टिकोन यांची छाप असते. कारण दिग्दर्शक हा चित्रपटाच्या निर्मिती प्रक्रियेत मुख्य घटक असतो. त्याच्या कल्पनाशक्तीच्या, प्रतिभेच्या कुशलतेवरच चित्रपटाचा दर्जा अवलंबून असतो. त्याला चित्रपट माध्यमाची, चित्रपटाच्या भाषेची सखोल माहिती असावी लागते. चित्रपटाला वैशिष्ट्यपूर्ण घाट प्राप्त होण्यासाठी त्याला कथावस्तूच्या निवडीपासून, पटकथा लेखन ते ती कथा चित्रपट माध्यमाद्वारे प्रेक्षक या आस्वादकापर्यंत सुबक, एकसंध आविष्कार म्हणून जावी यासाठी चित्रपटाच्या सर्व अंगांवर लक्ष केंद्रित करून त्यावर तो योग्य ते संस्करण करत असतो. त्याच्या दिग्दर्शनाखालीच संपूर्ण चित्रपटाची निर्मिती होत असते.

**माध्यमांतराची प्रक्रिया:-**

चित्रपट निर्मितीसाठी कथेची आवश्यकता असते. प्राचीन काळापासून मानवाला कथा ऐकण्याची व सांगण्याची आवड आहे. पूर्वीच्या काळी आजी नातवाला गोष्ट सांगायची मधल्या काळात हेच कार्य इसापनिती, बिरबल बादशहाच्या कथा, पंचतंत्र या कथांनी पुढे नेले. पुढे ते कार्य लघुकथांनी केले. तर चोवीस तास वाहिन्यांच्या युगात हे कार्य कार्टुन चॅनल्स करत आहेत. त्यातील छोटा भीम, डोरेमान, मिकी माऊस तसेच रामायण, महाभारत तसेच कौटुंबिक धारावाहिका यांच्या माध्यमातून कथा ऐकण्याची हौस भागविली जात आहे. चित्रपटांच्या माध्यमातूनही अशा प्रकारे कथांची निवड करुन त्या प्रेक्षकांपर्यंत पोहचविल्या जात असतात. चित्रपटाच्या यशामध्ये कथेची निवड महत्त्वाची ठरते. त्यासाठी निर्माता-दिग्दर्शक प्रथम कथेची निवड करतात. कथाकार किंवा कादंबरीकाराकडून त्या कथेचे हक्क विकत घेतात व तसा करार करतात. येथून साहित्यकृतीच्या रुपांतराचा प्रवास सुरु होतो. चित्रपटाचा आराखडा एकदा ठरला की, साहित्यकृतींमधील नेमक्या, निर्णायक प्रसंगावर लक्ष केंद्रीत करुन पटकथालेखन केले जाते. साहित्यकृतीचे हे माध्यमांतर करताना बऱ्याचवेळा लेखकाशी चर्चा केली जाते. उदा. नटरंगच्या निर्मितीत आनंद यादव यांचे मार्गदर्शन घेतले गेले तर जोगवाची पटकथा लिहीतांना पटकथाकार संजय पाटील यांनी राजन गवस यांच्याशी चर्चा केली होती. अशाच प्रकारे गीतांची निर्मिती करतानासुद्धा गीतकार, संगीतकार यांच्याशी चर्चा केली जाते.

पटकथा व संवाद तयार झाल्यावर दिग्दर्शक कलावंतांकडून अभिनय करुन घेतो. कलावंतांकडून अभिनय करुन घेताना दिग्दर्शक कॅमेरामनला योग्य अँगल लावण्यास सांगतो. प्रकाशयोजना करणारा आवश्यक तेवढा प्रकाश पुरवितो. लाईट-कॅमेरा तयार झाल्यावर दिग्दर्शक अपेक्षीत दृश्याचे चित्रीकरण करतो. दिग्दर्शकाचे समाधान होईपर्यंत रिटेक घेतले जातात. कितीही नावजलेला कलावंत असला तरी त्याला रिटेक द्यावेच लागतात. यावरुन कलावंतांचे परिश्रम व कष्ट करण्याची प्रबळशक्ती जाणवते. चित्रीकरण पूर्ण झाल्यावर त्यातून आवश्यक दृश्यांचे संकलन केले जाते. त्यानंतर कलावंतांना स्टुडीओत बोलावून आवाजाचे डबींग केले जाते. स्क्रीनवर दृष्य दाखविले जाते व हातामध्ये संवाद (स्क्रीनप्ले) दिले जातात. दृष्यांवरुन कलावंत आवाज देतात. दुय्यम व इतर कलावंतांचे आवाज व्यावसायिक कलाकार देतात. डबिंगमध्ये आवाज मॅच होणे महत्वाचे असते. डबिंग करताना कृत्रिम आवाजही दिला जातो. उदा. दरवाजा उघडणे, घोड्यांच्या पायांचा टपटप आवाज, ढग गरजणे, पिस्तूलातून गोळी झाडणे इत्यादी. डबिंग करताना साऊंड बँक वापरली जाते. अशा पद्धतीने चित्रपटांची निर्मिती होत असते.

चित्रपट निर्मितीत कथा-पटकथा-संवाद-चित्रीकरण हे टप्पे महत्वाचे असतात. मूळ कथेतील आशयसूत्र, व्यक्तिरेखा जशाच्या तशा ठेवून हे माध्यमांतर होत असते. यासंदर्भात निशाणी डावा अंगठा या कादंबरीचे लेखक रमेश इंगळे म्हणतात, 'रुपांतराचा प्रवास हा मूळ कथेपासून सुरु होतो. नाटक, चित्रपट ही माध्यमे वेगवेगळी असली तरी त्यांना काही एक कथा (गोष्ट) सांगायची असते ती कथा सांगण्याची प्रत्येक माध्यमाची मूलभूत भाषा वेगवेगळी असेल, परंतु कथा ही या माध्यमाची मूलभूत



Scanned with CamScanner

गरज आहे. कथा नसेल तर या माध्यमांचा अविष्कारच शक्य नाही. कथा ही या माध्यमाची मूळ गरज आहे.' लोकप्रिय साहित्यकृतीवर चित्रपट तयार केला तर आयत्या आशयसूत्रामुळे व साहित्यकृतीच्या लोकप्रियतेमुळे जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोहचता येते. हे श्यामची आई, पांगिरा, सिंहासन, दुनियादारी, नटरंग, जोगवा इत्यादी चित्रपटांनी दाखवून दिले आहे.

कथेवरुन पटकथा लिहिताना पटकथालेखकाला कॅमेऱ्याचे ज्ञान असणे आवश्यक असते. कारण दृश्यचित्रण करणारा कॅमेरा अनेक गोष्टी साधू शकतो, तसा बिघडवूही शकतो. म्हणूनच कॅमेऱ्याच्या कामाची माहिती असणे व त्याची परिभाषा वापरता येणे लेखकाच्या फायद्याचे ठरते. लेखनात उपयोगी पडणारे कॅमेऱ्याचे विशेष घटक असे- १) कॅमेऱ्याचे स्थान (लाँग शॉट, मिड शॉट, क्लोजअप) २) कॅमेऱ्याची हालचाल व ३) कॅमेऱ्याचा कोन यांनाच अनुक्रमे पोझिशन, मुव्हमेंट व अँगल असे म्हणतात. चित्रपटासाठी लिहिलेली पटकथा मूळ कथेतल्या कल्पनेला, पायरी पायरीने किंवा टप्प्या टप्प्याने एकेका सुट्या दृश्यात विभागेपर्यंतचा प्रवास असतो. त्यालाच कल्पना ते दृश्यविभागणी असे म्हणता येईल.

संहितालेखनात प्रेक्षकांशी थेट संवाद साधणाऱ्या भाषेलाही अतिशय महत्त्व असते. आपला दर्शक जसा दृश्यातून आपला संदेश ग्रहण करणार- विषय समजावून घेणार किंवा कथानक आस्वादणार, तसाच तो बोलले जाणारे निवेदन व संवाद म्हणजेच भाषाही ऐकणार आहे. म्हणजेच तो एका वेळी बघणे व ऐकणे अशा दोन क्रिया करणार आहे. साहजिकच त्याचे अवधान असे दुहेरी किंबहुना दुभागलेले असणार आहे. अशावेळी कानावर पडणारी भाषा क्लिष्ट व बोजड किंवा संवाद अकारण अलंकारिक असतील तर दर्शकाच्या आकलनावर ताण पडेल. मग तो त्रासून तरी जाईल किंवा आपल्या आस्वादातले ऐकणे सरळ सोडूनच देईल. म्हणून संहिता लेखकाने पाळावयाचे पहिले पथ्य म्हणजे लेखनाची भाषा साधी, प्रवाही आणि आवश्यक तेथे बोली स्वरुपाची असायला हवी. मूळ कथेतील कथानकात बदल न होता ही प्रवाही बोली वापरली जाते. त्यामुळे साहित्यकृतीने माध्यमांतर होताना त्यात अधिक प्रभावीपणा येऊ शकतो. अशा प्रकारे साहित्यकृतीचे माध्यमांतर करताना मूळ कथा, कॅमेऱ्याचे ज्ञान व संवादाची भाषा यांचे ज्ञान पटकथा लेखकाला तसेच दिग्दर्शकाला असणे आवश्यक असते.

**समारोप :-**

समकालीन दृश्यसंस्कृती तंत्रज्ञानाने घडवलेली, बहुमाध्यमीय आणि व्यामिश्र अशी आहे. कॅमेरा या यंत्राने मानवाची अवघी विश्वदृष्टीच बदलून टाकली आहे. फोटोग्राफी, सिनेमॅटोग्राफी, प्रोजेक्टर, टेलिव्हीजन, संगणक, इंटरनेट, ३-डी टेक्नॉलॉजी, मोबाईल या नविन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अनेक माध्यमांचा संकर होऊन बहुमाध्यमीयता उदयाला आली आहे. यात दृक-श्राव्य माध्यमाचा महत्त्वाचा वाटा असून कला म्हणून आणि उपजिविकेचे साधन म्हणूनही या माध्यमाचा मानवाला प्रगती साधण्यासाठी उपयोग होवू शकतो. त्यामुळे या माध्यमासाठी आवश्यक असणाऱ्या कला आणि या माध्यमाच्या स्वरुपानुसार विविध तंत्र आणि कौशल्ये अवगत करुन घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**


१) खांडेकर भालचंद्र, **साहित्यविचार**, आ. १ ली, पुणे, १९८८
२) सपकाळ अनिल, **मराठी चित्रपटाची पटकथा**, आ. २ री, पुणे, २०१२
३) थोरात राजेंद्र, साहित्यकृतीचे माध्यमांतर, **सक्षम समीक्षा**, एप्रिल-मे-जून २०१५
४) **दूरदर्शन- संवादाचे स्वरुप व कौशल्ये**, य.च.म.मुक्त विद्यापीठ, आ. १ ली, नाशिक, १९९३
५) देशपांडे अभिजीत अरविंद, समकालीन दृश्यभोवताल आणि माध्यमसाक्षरता, **नव अनुष्टुभ** व-९, अं.-२, मार्च-एप्रिल-२०१४


□□□



Scanned with CamScanner